नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३९/२०१६ मधील नि.५ खालील आदेश)

**(सुहास शिंदे** *विरुध्द* **यशवंत शिंदे)**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज देवून दावा मिळकतीमधील शेतजमिनीतील उत्तरेकडील १/२ हिश्यातील तसेच रहाते घराचे वहिवाटीस प्रतिवादीने दाव्याचा अंतिम निर्णय होईतोपर्यंत हरकत अडथळा करु नये, हुसकावुन लावु नये, विक्री व तबदिली करु नये वा नाव कमी करु नये अथवा बोजा निर्माण करु नये अशी प्रतिवादी नं.१ विरुध्द् तुर्तातुर्त मनाई आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

२. वादीच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी १ चे पुर्व हक्कदार पांडुरंग यांना मुलगा नसल्याने त्यांनी घरजावई ज्ञानु यांचा मुलगा प्रतिवादी १ हा दत्तक घेतला. त्यानंतर प्रतिवादी १ यांना कै. पांडुरंग यांचे पश्चात सर्व दावा मिळकती प्राप्त झाल्या. प्रतिवादी १ यांना वादी नं.२ हिचे विवाह बंधनातुन वादी नं.१ व प्रतिवादी नं.२ व ३ ही अपत्ये झाली व ते कडेगांव येथील प्रतिवादी १ यांचे वडिलार्जीत एकत्र कुटुंबातील घरामध्ये राहुन वडिलार्जीत शेतजमिनी वहिवाटत होते. कै. पांडुरंग यांची मिळकत प्रतिवादी १ व त्यांचे बंधु नारायण यांचे निम्मे निम्मे हिश्श्याने घ्यावयाचे ठरले होते. तसेच यशवंत यांचे जनक वडील ज्ञानु यांची मौजे खंबाळे येथील त्यांची जमिन देखील प्रतिवादी १ व त्यांचे बंधु नारायण यांचेत घ्यावयाचे ठरले होते. तथापि प्रतिवादी १ यांनी कोणताही मोबदला न घेता खरेदीपत्राने वडिलार्जीत मिळकत १अ पैकी निम्मी मिळकत कै. नारायण यांचे नावे तबदील केली. पुढे नारायण मयत झालेनंतर त्यांचे पत्नीचे ऐकुन वडिलार्जीत घर मिळकती देखील विक्री केल्या. असे असताना केवळ कै. नारायण यांचे पत्नीचे ऐकुन प्रतिवादी १ हा शेतजमिनीमध्ये स्वतंत्र घर बांधुन प्रतिवादी नं.४, ५ व ७ सोबत घरात राहुन शेतीतुन येणारे सर्व उत्पन्न वादी व त्याचे कुटुंबास न देता त्याची विल्हेवाट लावू लागले. याबाबत वादीने जाब विचारता वादींना मारहाण

करुन घरातुन हाकलुन देण्याची धमकी देवु लागले.

वादीचे पुढे असे कथन आहे कि दावा मिळकतीत जरी वादींची वहिवाट असली तरी नाव लावुन देणेस प्रतिवादी १ हे तयार नाहीत. सबब शेतीतुन मिळणा-या नगदी उत्पन्नाची प्रतिवादी १ लुबाडणूक करीत आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी १ यांनी प्रतिवादी नं.४, ५ व ७ यांचे मदतीने व अन्य मार्गे वादींना दावा मिळकतीमधुन हुसकावुन लावु नये व त्यांचे दावा मिळकतीमधील उत्तर बाजुच्या निम्म्या हिश्यातील वहिवाटीस हरकत अडथळा करु नये यास्तव वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करुन वरीलप्रमाणे तुर्तातुर्त मनाईची मागणी करणे भाग पडलेले आहे.

**३**. प्रतिवादी नं.२, ३ व ८ यांना समन्स तसेच नोटीसीची बजावणी होवुन देखील तसेच त्यांना पुरेशी संधी देवुन देखील ते या कामात हजर होवुन त्यांनी दाव्यास व प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे दाखल केले नाही. सबब दिनांक २९.०९.२०१६ व दिनांक ११.०४.२०१७ रोजी निशाणी १ वरील आदेशाने सदर प्रतिवादींविरुध्द दावा ''एकतर्फा'' चालविणेबाबत आदेश झालेला आहे. तसेच प्रतिवादी नं.१ व ४ ते ७ हे समन्सची बजावणी झालेनंतर वकिलांमार्फत हजर झाले आहेत. तथापि त्यांना पुरेशी संधी देवुनही त्यांनी दाव्यास व तुर्तातुर्त ताकीद अर्जास आपले म्हणणे व कैफियत दाखल केली नाही. यास्तव दिनांक २९.०९.२०१६ रोजी निशाणी १ वरील आदेशाने सदर प्रतिवादींविरुध्द् दावा ''विना कैफियत'' चालविणेबाबत आदेश झालेला आहे.

४. वादीच्या कथनांचा विचार करता पुढील मुद्दे उपस्थित होत असुन त्यावर मी माझे निष्कर्ष पुढीलप्रमाणे कारणमिमांसेसहीत नोंदवित आहे :-

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २ | वादीने न्यायाचा तराजू त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| ३ | वादीस तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| ४ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## : **कारणमिमांसा** :

**५**. सदर कामी महत्वाची नमूद करावयाची बाब म्हणजे तुर्तातुर्त मनाईची मागणी मिळविण्यासाठी सकृतदर्शनी केस, न्यायाचा तराजू या बाबी वादीने त्याच्या बाजूने असल्याचे दर्शवून देणे गरजेचे असते. तसेच तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे ही बाब देखील वादीने सिध्द् करणे गरजेचे असते. सबब, वरील तीनही बाबी वादीने सिध्द करणे अपेक्षित असते.

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता :-**

**६**. वादीने प्रस्तुत अर्जाचे कामी दावा कलम १ मधील शेतजमीनीतील उत्तरेकडील १/२ हिश्यातील तसेच रहाते घराचे वहिवाटीस या दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत प्रतिवादींनी हरकत व अडथळा करु नये, वादींना हुसकावुन लावु नये तसेच संपुर्ण दावा जमिनीमधील असले प्रतिवादी नं.१ चे नावाचा गैरफायदा करुन घेवुन त्याची विक्री, तबदिली व अन्य प्रकारे नाव कमी करणे तसेच बोजा करणे इत्यादी बाबी करु नयेत अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत यावी याबाबत विनंती केली आहे. वादीच्या विनंतीचा विचार करता, वादी हा दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीबाबत तसेच दावा मिळकतीचे

मालकी बाबतही दाद मागत असलेचे दिसुन येते.

७. वादीने दावा मिळकती हया त्याचे वडील प्रतिवादी नं.१ यास दत्तक वारसाने मिळालेली मिळकत असुन ती वडिलार्जित असलेने त्यामध्ये जन्माने व नात्याने वादी व प्रतिवादी नं.२ व ३ यांना समान हिस्सा येतो असे कथन केलेले आहे. तथापि अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केलेल असता, वादीने ज्या दत्तक संस्कारांबाबत विधान केले आहे त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी हजर केलेला नाही.

८. वादीने दाव्याचे कामी प्रतिवादी नं.१ यांनी त्यांचे नावावरुन दत्तक वारसाने प्राप्त झालेल्या सर्व शेतजमीनींपैकी १/२ हिस्सा मयत नारायण यास विनामोबदला खरेदीपत्राने दिलेला असल्याचे व मयत नारायण यांनी मौजे खंबाळे येथील जमिनीमधील १/२ हिस्सा प्रतिवादी नं.१ यांचे नावे दिल्याचे कथन केलेले आहे. तसेच वादीचे मते सन १९८१ व १९८५ पासुन या मिळकतींमध्ये यशवंत व नारायण यांची स्वतंत्र वहिवाट होती व आहे. वादीने या झाले व्यवहारांबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयामध्ये दाखल केलेला नसुन दावा मिळकतींपैकी नेमक्या कोणत्या मिळकतीं प्रतिवादी नं.१ यास व कोणत्या मिळकती मयत नारायण यास मिळालेल्या आहेत हे त्यामुळे स्पष्ट होत नाही. अभिलेखावरील दावा मिळकतीचे ७/१२ उतारे पहाता त्यात प्रतिवादी नं.१ व मयत नारायण यांचे वारसांचे नावाची नोंद दिसुन येते. तथापि या मिळकतींमध्ये प्रतिवादी नं.१ व मयत नारायण यांना कशाप्रकारे हक्क प्राप्त झाला आहे हे स्पष्ट होत नसल्यामुळे प्रस्तुत मिळकती हया प्रतिवादी नं.१ यांच्या वडिलार्जित मिळकती आहेत या निष्कर्षापर्यंत सद्यस्थितीत पोहोचता येत नाही. सबब जरी वादीची केस प्रतिवादींनी नाकारलेली नसली तरी मुलत: वादीने अर्जातील कथने न्यायालयासमोर प्रथमदर्शनी शाबीत करणे जरुरीचे आहे. अशाप्रकारे वादीकडुन कोणत्याही प्रकारे अर्जातील कथनास दुजोरा मिळेल अशाप्रकारचा कोणताही कागदोपत्री

पुरावा न्यायालयासमोर दाखल केलेला नाही.

९. वादी हा दावा कलम १ मधील शेतजमीनीतील १/२ हिश्यातील व त्यामधील त्याचे रहाते घराचे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशी विनंती करीत आहे. तथापि वादीने दावा मिळकतींमध्ये त्याची कब्जेवहिवाट आहे हे प्रथमदर्शनी दाखवुन दिलेले नाही. याउलट दावा मिळकतींचे ७/१२ उता-यांचे अवलोकन केले असता त्यात प्रतिवादी नं.१ यांचे नावाची मालक व कब्जेदार सदरी नोंद असल्याचे दिसुन येते. तसेच वादी हा दाव्यामध्ये व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये, दावा मिळकतीमध्ये सन १९८१ व १९८५ पासुन प्रतिवादी नं.१ व मयत नारायण यांची वहिवाट होती व आहे असे कथन करत आहे. अशा परिस्थितीमध्ये मुळ मालकाविरुध्द् कायदयाचे तरतुदीनुसार तुर्तातुर्त मनाई आदेश करणे योग्य होणार नाही.

१०. वादीने दावा मिळकतीचे हस्तांतरण होवु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई देणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि वादीने या मिळकती हया वडिलार्जित मिळकती आहेत व त्यामध्ये त्यास कायदेशीर हक्क प्राप्त होत आहे हे न्यायालयास समाधानकारक अशा पुराव्याआधारे दाखवुन दिलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं.१ यांचेविरुध्द् तुर्तातुर्त मनाई आदेश करणे न्यायोचीत वाटत नाही.

११. वादीने दावा मिळकतींमध्ये त्याचा असणारा कायदेशीर हक्क व कब्जेवहिवाट दाखवुन दिलेली नसलेमुळे तुर्तातुर्त मनाई आदेश न झालेस वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे अशी परिस्थिती दिसुन येत नाही. याउलट तुर्तातुर्त मनाई आदेश झालेस मुळ मालकास दावा मिळकतींमध्ये त्याचे अस्तित्वात असणा-या हक्कांपासुन वंचीत ठेवले जाण्याची शक्यता आहे. परिणामी मुळ मालक म्हणजेच प्रतिवादी नं.१ यांचेच नुकसान होणार आहे. सबब वरील सर्व बाबींचा विचार करता

दावेची संयुक्तिक बाजु, न्यायाचा तराजु व अपरिमित नुकसान या बांबी वादीचे बाजुने असलेचे दिसुन येत नसलेमुळे मी मुद्या क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**मुद्दा क्र.४ करिता :-**

**१२**. सदर कामी, वर नमूद केल्यानुसार वादीने तीनही मुद्दे त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केलेले नाही. अशा परिस्थितीत, वादी तुर्तातुर्त मनाईची मागणी मिळण्यास पात्र नसून प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नसल्याने मी मुददा क्र.४ चा निष्कर्ष त्याप्रमाणे काढून पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे:-

**: आदेश :**

१. वादीचा निशाणी ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(खुले न्यायालयात सांगितले व घोषित केले)

**सही /-**

**दिनांक २६.०९.२०१७**.

( श्रीमती. दु. भ. सुतार )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कडेगांव.